दिनांक ०८.१०.२०२५ रोजी–

**अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर पुढील उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस.,विधीज्ञ यांचे द्वारा सुरु–**

**६८.** विभागीय क्रिडा संकुल समितीची रोकड नोंदवही (कॅश बुक) ही हर्शकुमार क्षिरसागर संभाळत होता. हे म्हणने खरे आहे की, ही बाब मी प्रथमच मा .न्यायालयात सांगीतली, ही बाब मी पोलीसांना तपासातही सांगीतलेली नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र.१ यास अडकविण्यासाठी प्रथम हे बिनबुडाचे बयाण न्यायालयात मी देत आहे. हे म्हणने खरे आहे की, आरोपी हर्षकुमार क्षिरसागरच्या कर्तव्य यादीत कॅशबुक संभाळण्याचे काम कधीही नव्हते. कॅशबुक हे लेखा विभागाच्या ताब्यात असते. कथीत आरोपांच्या कालावधीत लेखा विभागाच्या लेखा लिपीक यशोदा शेट्टी यांचेकडे कॅशबुक ताब्यामध्ये होते. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या निशाणी क्र.५५–सरतपास अथवा उलटतपास जो आज पर्यंत झाला तो पर्यंत मी कुठलेही कॅशबुक बघीतलेलेच नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सरतपास अथवा आता पर्यंत झालेल्या उलटतपासात मी कुठलेही कॅशबुक पाहिलेले नाही असे सांगीतले.

**६९.** निशाणी क्र.७५ पत्र चे आर्थीक गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक, औरंगाबाद यांना दिले ते मीच संगणकावर तयार केलेले आहे. हे म्हणने खरे आहे की, असे पत्र तयार करणे किंवा कोणताही लिखीत स्वरुपात पत्रव्यवहार करणे याबद्दल मला लिखीत स्वरुपात अधिकार दिलेले नाहीत. हे मला माहीत आहे की, कार्यालयीन पत्र हे रबर सील मारुन दिले जाते. मला पत्र निशाणी क्र.७५ हे दाखविले. हे पत्र मी जावक नोंद करून पाठविले. सदरची जावक नोंद ही मीच केलेली आहे. त्या पत्राचा जावक क्रमांक ३४२/२०२४–२५ असा आहे. हे म्हणने खरे आहे की, हे जावक जर जावक नोंदीमध्ये नसेल तर पत्र निशाणी क्र. ७५ हे बनावट असेल. हे म्हणने खरे आहे की, जी काही कागदपत्रे आमच्या कार्यालयाची आहेत ज्यावर जावक क्रमांक नमुद आहेत परंतु ती जावक नोंदवहीत नसेल तर ती सर्व कागदपत्रे ही बनावट आहेत.

**७०.** मला निशाणी क्र.७२ जावक नोंदवही दाखविली, यामध्ये जावक क्रमांक ३४२/२०२४–२५ निशाणी क्र.७५ च्या पत्राची नोंद नाही. हे म्हणने खरे आहे की, मी सांगीतलेल्या आत्ता पर्यंतच्या पुराव्यात आमच्या कार्यालयाने कुठेही एक पेक्षा जास्त जावक नोंदवह्या ठेवल्याचे मी सांगीतलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ व निशाणी क्र.७० अधिकारपत्र तसेच निशाणी क्रमांक ७६–आदेश ह्या कुठल्याही दस्तांच्या नोंदी ह्या निशाणी क्र. ७२ जावक नोंदवहीमध्ये नाहीत. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.७५ या पत्रामध्ये कोणते कागदपत्रे देत आहे याची यादी अथवा कोणती कागदपत्रे मागीतली होती अथवा ती कोणाला मागीतली होती या विषयी काहीही जोडलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, निशाणी क्र.५६,७०– अधिकारपत्रे, निशाणी क्र.७५–पत्र,नि.क्र.७६–आदेश हे मी व श्री. संजय सबनीस असे दोघांनी बोगस व बनावट बनविलेले आहेत.

**७०.** हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनिस हे औरंगाबाद येथे कार्यरत होण्यापुर्वी त्यांनी धुळे येथेही काम संभाळलेले होते. श्री. संजय सबनिस यांच्या मागील १० वर्षेच्या कामकाजाबद्दल ज्यामध्ये

त्यांनी कुठे कुठे काम केले ह्या बद्दल मला सर्व माहीत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मला मागिल ०५ वर्षे श्री. संजय सबनिस हे कोठे कार्यरत होते, हे मला माहीत नाही. श्री. संजय सबनिस हे धुळे येथे कार्यरत असतांना मोठ्या रकमां बाबतचे भ्रष्टाचारांचे आरोप त्यांच्यावर झाले याबद्दल मला वैयक्तीक माहीत नाही. श्री. संजय सबनिस यांची आत्ता पर्यंत त्यांच्यावर जे वेगवेगळे भ्रष्टाचाराचे आरोप झाले अथवा धुळे येथे त्यांच्यावर जे आरोपी झाले त्याबद्दल त्यांची विभागीय चौकशी झाली याबद्दल मला वैयक्तीक माहीती नाही.

**७१**. मी आरोपी विरुध्द मला सांगण्यात आलेल्यानुसार एफ.आय.आर दाखल केल्या पासून ते आज अखेर श्री. संजय सबनिस यांचेवरती काही विभागीय क्रिडा संकुल समितीने काही विभागीय चौकशी केली अथवा नाही याची मला माहीती नाही. हे म्हणने खरे आहे की, हा एफआयआर दाखल झाल्यानंतर श्री. संजय सबनिस यांना विभागीय क्रिडा संकुल समिती औरंगाबादच्या उपसंचालक/सचिव पदावरुन काढुन त्यांची दुसरीकडे लगेच बदली करण्यात आली. मी, श्री. संजय सबनिस –उपसंचालक/सचिव या पदावरून पदमुक्त का करण्यात आले? याची कागदपत्रे मी आज अखेर पाहिलेली नाही. हे म्हणने खरे आहे की, ज्या व्यक्तीला अटक होण्याची भिती असते अथवा आरोपी करणार असतील तोच व्यक्ती मा. न्यायालयात धाव घेतो. श्री. संजय सबनिस हे या प्रकरणातील प्रथम खबर दाखल झाल्यापासून किती दिवस फरार होते याबद्दल मला माहीत नाही. मी संजय सबनिस यांचे अटकपुर्व जामीनाची कारवाई ही कोणत्याच वकीलांमार्फत केलेली नाही. हे म्हणने खरे नाही की, श्री. संजय सबनिस यांचे अटकपुर्व जामीनाच्या कारवाईसाठी सर्व कारवाई मी स्वतः वैयक्तीक धावपळ करून केलेली आहे. हे मला माहीत नाही की, श्री. संजय सबनिस यांनी मा. जिल्हा न्यायालयात अटकपुर्व जामीन मिळाण्याकरीता अर्ज केलेला होता. हे म्हणने खरे आहे की, आज पर्यंत श्री. संजय सबनिस यांनीच मला प्रथम खबर दाखल करण्यास सांगीतले तरी सुध्दा त्यांचेकडुन अथवा त्यांचे कार्यालयाकडुन त्यांनी अटकपुर्व जामीनाकरीता अर्ज केला याबद्दल मला काहीच माहीती नाही असेच माझे म्हणने आहे.**७२**. आता मला निशाणी क्रमांक १५६ वर दाखविण्यात आलेला जामीन अर्ज प्रकरण क्रमांक ५१/२०२५ व अर्जदार नामे संजय अरविंद सबनिस यांचा आहे. निशाणी क्र.१५६ वर असलेल्या प्रकरणानुसार श्री. संजय सबनिस यांनी केलेला जामीन अर्ज मागे घेऊन तो निकाली केल्याचा आदेश आहे. हे मला सांगता येणार नाही की, सर्वसाधारण बुद्धीचातुर्यानुसार हा अर्ज श्री. संजय सबनिस यांनी आरोपी करणार या भितीपोटी केलेला दिसत आहे.

**७३**. विभागीय क्रिडा संकुल समिती व उपसंचालक क्रिडा व युवक कार्यालय या दोन्ही कार्यालयातील प्रथम खबर करण्यात आली त्या काळात बरेचशे संगणक हे बंद पडलेले होते, हे मला माहीत नाही. विभागीय क्रिडा संकुल समिती व उपसंचालक क्रिडा व युवक कार्यालय या दोन्ही कार्यालयात त्या काळात एकच संगणक दोन्ही कार्यालयातील कर्मचारी वापरत होते, याबद्दल मला माहीती आहे. हे म्हणने खरे आहे की, या संगणकाला कुठलाही पासवर्ड नव्हता अथवा विशेष लॉगइन आयडी नव्हता. हे म्हणने खरे आहे की, त्या संगणकात दोन्ही आस्थापनांच्या, बीलांच्या अथवा इतर कार्यालयीन कामकाजाच्या नोंदी ठेवण्यात आलेल्या होत्या. श्री. संजय सबनिस हे तोच संगणक

वापरत होते याबद्दल मला माहीती नाही. तो संगणक ज्या ठिकाणी ठेवलेला होता त्या ठिकाणी ब–याच मोबाईल कंपन्यांचे नेटवर्क येत नव्हते, याबद्दल मला माहीत नाही. तेथे बायफाय राऊटर आहे. श्री. संजय सबनिस हे त्यांच्या मोबाईला नेटवर्क येत नसल्यामुळे ते आरोपी क्र.१ चे मोबाईल वापरत, याबद्दल मला माहीत नाही. श्री. संजय सबनिस यांचा मोबाईल क्रमांक मला पाहिल्या शिवाय सांगता येणार नाही. श्री. संजय सबनिस यांचा मोबाईल क्रमांक साक्षीदाराच्या मोबाईल मध्ये सेव्ह करण्यात आलेला आहे त्यावरून ते मोबाईल क्रमांक सांगतात की,८८८८८६६६५१ असा आहे, हा एकच मोबाईल क्रमांक श्री. संजय सबनिस वापरतात. व्हाट्सॲप किंवा टेलीग्राम या माध्यमातून श्री. संजय सबनिस हे आरोपी क्र.१ ला ब–याच वेळा मॅसेज पाठवायचे अथवा व्हाट्सॲप कॉल द्वारे आरोपी क्र.१ शी ते बोलत, याबद्दल मला काहीही माहीती नाही. वायफाय राऊटर बसविलेला होता त्याचा ब–याच वेळेला नेटवर्कची अडचण येत, याबद्दल मला माहीती आहे. ज्यावेळेला वायफाय नेटवर्कची अडचण येत त्या वेळेला ब–याचदा श्री. संजय सबनिस हे आरोपी क्र.१ याचा मोबाईल वापरून त्यातील इंटरनेटचा वापर करून ते ब–याच वेळा कॉल करीत अथवा त्या मोबाईल मधील इंटरनेटच्या माध्यमातून ते त्यांचे कामकाज करीत, याबद्दल मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनिस हे वर नमुद एकाच संगणकावर काम करीत त्यावेळेला मी त्यांच्या सोबत कधीही काम केलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, तो एकमेव संगणक सर्व जण वापरत तो पोलीसांनी जप्त केलेला आहे.

७४. हे मला माहीत नाही की, श्री. संजय सबनिस हे प्रथम खबर देण्यापुर्वी त्यांच्या वैयक्तीक बँकेच्या कामासाठी अथवा बँकेत कार्यालयीन कामकाजाकरीता ब–याच वेळा स्वतः जात. माझे असेही कुठे म्हणने नाही की, श्री. संजय सबनिस हे इंडीयन बँकेत (ज्या ठिकाणी विभागीय क्रिडा संकुल समितीचे खाते आहे) जात नव्हते. श्री. सुशीलकुमार सैनी यांचेशी सुध्दा श्री. संजय सबनिस यांचे मैत्रीपुर्वक संबंध होते व त्यांचेशी त्यांची गाठ–भेट होत याबद्दल मला माहीत नाही. हे म्हणने खरे नाही की, बँक खात्या संबंधी कुठलाही बदल करावयाचा असेल त्या करीता विभागीय क्रिडा संकुल समितीचे अध्यक्षांच्या अधिकृत पत्र अथवा आदेश लिखीत स्वरुपात असल्याशिवाय तो बदल करता येत नाही. बँक खात्याच्या संबधात काही बदल करायचे असल्यास अधिकृत पत्र अथवा लिखीत आदेश हा सचिव, विभागीय क्रिडा संकूल समिती यांच्या आदेश अथवा पत्राने करता येतो. मी उपनियम वाचुनच हे सांगत आहे. मला कोणत्या नियमानुसार हे लिहलेले आहे हे सांगता येणार नाही. बँकेमध्ये नवीन खाते काढायचे असल्यास सचिव, विभागीय क्रिडा संकुल समिती यांच्याच पत्रानुसार या नियमानुसार काढता येते हे बरोबर का चुक हे मला सांगता येत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी नियमानुसार सचिव, विभागीय क्रिडा संकुल समिती यांच्या पत्रान्वये अथवा आदेशाने बँकेत दिलेला आदेश बदलू शकतात या बद्दल मी जे सांगीतले हे सर्व मी विभागीय क्रिडा संकूल समितीमध्ये काम करीत असल्यामुळे खोटे सांगत आहे. मला शपथेवर काही सांगीतल्यावर ते पुन्हा ते पुन्हा शपथेवर बदलून खोटे सांगायची सवय नाही. मी कार्यालयासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे हो किंवा नाही यामध्ये विचारलेल्या प्रश्नांवरती अवलंबून सांगू शकतो. हे म्हणने खरे आहे की, प्रथम खबर अहवाल दाखल होई पर्यंत विभागीय क्रिडा संकुल समितीचे बँकेचे अधिकार हे श्री. संजय सबनिस यांचेकडे होते. त्याच

काळात इंडीयन बँकेचे संबंधीत शाखेचे सर्व अधिकार हे तत्कालीन शाखा अधिकारी श्री. सुशीलकुमार सैनी यांचेकडे होते, याबद्दल मला माहीती नाही. तक्रार दिल्यानंतर इंडीयन बँकेच्या संबंधीत शाखेचे नियत्रंण अधिकारी हे श्री. सुशीलकुमार सैनी हे मी बँकेत गेलो त्यावेळेला माझ्या माहीतीनूसार होते.

**७५.** मी, निशाणी क्र.६६ माझा जबाब मधील पान क्रमांक ३ व ४ ह्यामध्ये मी जे काही ईमेल्स किंवा मोबाईल बाबतीत कथन केले आहे या ईमेल्स, मोबाईल नंबर कोणाच्या नावे आहे याबद्दल काही कागद किंवा ते ईमेल्स अथवा कोण वापरते याबद्दल लेखी पुरावा पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, या पान क्र.३ व ४ मध्ये नमुद ईमेल्स चे सव्र्हर लॉग आणि आय.पी. एक्सेस रिपोर्ट व आय पी एड्रेस हे मी तक्रारदार म्हणून पोलीसांना कधीही दिलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, मी माझ्या सहीचा कुठलाही लिखीत पुरावा या संदर्भात पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, संगणकाच्या, मोबाईलच्या अथवा इतर डेटा यांचा हॅश व्हॅल्युज आणि हेडर इन्फरमेशन मी पोलीसांना कधीही लिखीत दिलेले नाहीत. आयटी एक्टच्या कलम ६६–सी प्रमाणे त्याच्या अंतर्गत डिजीटल फॉरेन्सीक डॉक्युमेंटची पुष्टी याबद्दल मी माझ्या सही निशी अथवा त्याच्या बद्दलचा कागद मी पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.६६–जबाब व निशाणी क्र.५५–सरतपासामध्ये मी जे काही बाबी नमुद केल्या आहेत त्यासाठी मी पोलीसांना कोणताही स्वरुपाचा लिखीत पुरावा अथवा आधार दिलेला नाही व मी फक्त यामध्ये माझे तोंडी कथन केले आहे.

**७६.** हे म्हणने खरे आहे की, बँकेसाठी जे काही पत्रव्यवहार आणि सगळे अधिकार हे श्री. संजय सबनिस शिवांय कोणालाही नव्हते व त्याच्या वैयक्तीक सही शिवाय बँकेच्या अधिकारात काही बदल करता येत नव्हता.

**७७.** सन २०२३–२४ मधील आवक जावक नोंदवहीमधील नोंदी ह्या जो कोणी व्यक्ती संभाळतो ती व्यक्ती बरोबर करीत आहे अथवा नाही व त्या नोंदी बरोबर आहेत किंवा नाही हे मी पाहिलेले नाहीत. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनिस यांच्या कर्तव्यामध्ये सुध्दा आवक जावक मधील नोंदी तपासण्याचे कर्तव्य होते. श्री. संजय बननिस यांनी प्रथम खबर नोंद होईपर्यंत आवक जावकच्या ज्या काही नोंदी होत आहेत त्या तपासणे हा श्री. संजय सबनिस यांचाच भाग होता व त्या नोंदी बरोबर असल्याचा शेरा मारलेला नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी हे सांगु शकणार नाही. मी जेंव्हा आवक जावक नोंदी पाहिल्या मला तसा शेरा आढळलेला नाही. मला आज पर्यंत आवक जावक नोंदी बद्दल श्री. संजय सबनिस यांनी तसा शेरा मारला हे ऐकलेले नाही.

**७८.** हे म्हणने खरे आहे की, एखाद्या व्यक्तीला दुस–या व्यक्तीचे बँक स्टेटमेंट अथवा त्या बँकेच्या खात्याचे अधिकार त्याला नसतांना त्याचे स्टेटमेंट मागता येत नाही. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीच्या खात्याचे फिर्याद दाखल होई पर्यत श्री. संजय सबनिस यांना अधिकार होते. प्रकरण समजल्यानंतर मी इंडीयन बँकेच्या झोनल ऑफीसला या बद्दल तक्रार केलेली नाही, संजय सबनिस यांनी तक्रार केली अथवा नाही, हे मला माहीत नाही. मी सोबत आणलेल्या कार्यालयीन अभिलेखात श्री. संजय सबनिस यांनी बँकेच्या झोनल ऑफीसला तक्रार केल्याचा कागद नाही. इंडीयन बँकेच्या, बँकीग ओम्बर्डस्मन कडे मी तक्रार केली नाही अथवा श्री. संजय सबनिस यानी

तक्रार केल्याबद्दल मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक १२.१२.२०२४ रोजी निवीदा प्रक्रिया चालू करण्याबद्दल इंडीयन बँकेला श्री. संजय सबनिस यांनी कळवीले ही माझी ऐकीव माहीती आहे. हे म्हणने खरे आहे की, नेटबँकींग प्रणालीच्या बाबतीत किंवा जे काही बँकेचे कथीत व्यवहार झाले याचे चौकशी करण्याचे अधिकार मला दिलेले नाहीत. हे म्हणने खरे नाही की, त्यामुळेच मी वैयक्तीक कथीत व्यवहाराबद्दल बँकेकडे चौकशी केलेली नाही. हे म्हणने खरे नाही की, माझे अधिकार मला नसतांना काम करण्याची प्रवृत्ती आहे. हे म्हणने खरे आहे की, माझ्याकडे लेखी अधिकार दिलेला नसतांना मी बँकेकडे जाऊन चौकशी केली. मला बँकेत चौकशी करण्याचा तोंडी स्वरुपात आदेश लिखीत न देता श्री. संजय सबनिस यांनी सांगीतले.

**७९.** हे म्हणने खरे आहे की, दिनां १६.०५.२०२४ रोजीचे कथीत पत्र ज्याचा उल्लेख मी माझ्या सरतपास परिच्छेद १५ व १६ मध्ये केला ते पत्र माझ्या समोर तयार झालेले नाहीत. हे पत्र कोणी बनविले त्याचे नाव हे सांगावे असे मला श्री. संजय सबनिस यांनी सांगीतले. हे म्हणने खरे नाही की, परिच्छेद १५ व १६ मध्ये मी जे काही सांगीतले आहे त्यास लेखी आधार नाही. साक्षीदार पुन्हा सांगीतो की, याबद्दल माझ्याकडे लेखी अधिकार नाही. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या संपुर्ण पुराव्यात आरोपी क्र.१ बद्दल जी काही कथन केली ती सर्व श्री. संजय सबनिस यांच्याशी संगणमत करून खोटी कथने केलेली आहेत.

८०. हे म्हणने खरे आहे की, आरोपी क्र.१ याने बनावट ईमेल आयडी – dscych.sambhajinagar@gmail.com हा तयार केला असे माझे जे म्हणने आहे हे माझे तोंडी कथन आहे याला कोणताही माझ्याकडे लेखी पुरावा नाही. हे म्हणने खरे आहे की, तक्रारदार म्हणून मी जी काही आरोपी क्र.१ विरुध्द जी काही कथने केलेली आहेत त्या बदद्लची कागदपत्रे मी मिळविण्याचा प्रयत्न केलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र.१ याने माझ्या समक्ष कोणताही कागद लिहलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र.१ याचे हस्ताक्षर मी ओळखत नाही. हे म्हणने खरे आहे की, जे काही बनावट पत्र आहेत ते व त्यातील हस्ताक्षर हे मी स्वतः वैयक्तीक तपासुन पाहिलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, मी जी काही कथने आरोपी क्र.१ विरुध्द सरतपासात परिच्छेद क्र.१७ मध्ये केलेली आहेत ती सर्व खोटी आहेत. हे म्हणने खरे आहे की, दिनांक १३.१२.२०२४ रोजीचे बँक स्टेटमेंट मध्ये कथीत बदल केले आहे हे जे काही मी कथन आहे त्या बाबत माझ्याकडे लेखी आधार नाही व त्याबाबतीत मला वैयक्तीक माहीती नाही. हे म्हणने खरे नाही की, मला काही माहीत नसतांना परिच्छेद क्र.१८ मध्ये मी नव्याने सामील करून सर्व खोटे कथन केले आहे. श्री. संजय सबनिसांविरुध्द कलम ४२० भा.द.वि अंतर्गत एक गुन्हा दाखल आहे, याबद्दल मला माहीत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी, श्री. सुशीलकुमार सैनी व श्री. संजय सबनिस यांच्याशी संगणमत करून सर्व काही माहीती असतांना खोटे कारस्थान करून आरोपी क्र.१ यास अडकविण्यासाठी खोटा गुन्हा दाखल केला व त्या खोट्या गुन्हयात मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने

खरे नाही की, मी, श्री. सुशीलकुमार सैनी व श्री. संजय सबनिस तसेच आम्हां सर्वांकडुन आरोपी क्र.१ च्या जीवीतास धोका आहे.

**(आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे पत्र जे हस्ताक्षर तज्ञांच्या तपासणीसाठी गेलेले आहे त्याबद्दल राखुन ठेऊन उर्वरीत उलटतपास)**

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.२ व ३ करीता विद्वान श्री. राठी पी.एस, विधीज्ञ यांचे सहकारी कनिष्ठ विधीज्ञ श्री.एस.एस. कुरील यांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक–०८/१०/२०२५